# 2 मार्च

## आजचा सुविचार :

“नेहमीच लहान बनून राहा प्रत्येक जण तुमच्याबरोबर बसू शकतो, आणि इतके मोठे व्हा की जेव्हा आपण उठाल तेव्हा कोणीही बसलेले नसेल.”

## आजचे पंचांग :

वार – बुधवार

दिनांक : 2 मार्च 2022

मास – माघ

नक्षत्र – शततारका

सुर्योदय – सकाळी 6. 49 वाजता

सूर्यास्त – सायंकाळी 6. 40 वाजता

## आजचे दिनविशेष :

**राष्ट्रीय क्रीडा कौशल्य दिन**

1949 ला आजच्या दिवशी देशाला प्रसिद्ध स्वातंत्र्य सैनिक सरोजनी नायडू यांचे निधन.

1930 ला आजच्या दिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली काळा राम मंदिरामध्ये सर्वांना प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह करण्यात आला.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) heaven – स्वर्ग 2) height - उंची

3) knee – गुडघा 4) honest – प्रामाणिक

## आजची प्रश्नमंजुषा :

1) एका दिवसात किती तास असतात?

2) लीप वर्षात किती दिवस असतात?

3) भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून कोणाला ओळखले जाते?

4) ज्वलनासाठी कोणत्या वायूची गरज असते?

**बोधकथा :**

## गर्विष्ठ गुलाब

एक गुलाब होता त्याला त्याच्या सौंदर्यावर खूप गर्व होता. त्याला एकाच दुःख होते की तो काटेरी निवडूंग शेजारी वाढत होता. दररोज गुलाब त्या निवडुंगाच्या दिसण्यावरून अपमान करीत असे, पण निवडुंग शांत असे, बागेतल्या इतर रोपट्यांनी गुलाबाला समजावण्याचा प्रयत्न केला, पण गुलाब स्वतःच्या सौंदर्याबद्दल खूपच जागरूक होता.

एकदा उन्हाळ्यात बागेतली झाडे कोरडी पडली. गुलाब कोमेजू लागला. गुलाबाने पहिले एक चिमणी तिची चोच पाण्यासाठी निवडुंग मध्ये डूबवत होती. गुलाबाला खूप लाज वाटली. तरीसुद्धा त्याने निवडूंगास विचारले, “ मला पण पाणी मिळेल का?” दयाळू निवडुंग लगेच “हो” म्हणाला आणि त्या दोघांच्या मैत्रीमुळे त्यांनी कडक उन्हाळ्याला तोंड दिले.

**तात्पर्य – कोणत्याही व्यक्तीविषयी त्याच्या दिसण्यावरून मत बनवू नका.**